CNR No. MHRG120002672017

नियमीत दिवाणी दावा क्र. २५/२०१७
सचिन वि. सुनिल

## निशाणी क्र. ४५ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम १० (२) नुसार दावामध्ये पक्षकार सामील करण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार समाविष्ठ केले नसल्याबाबत मुद्दा निश्चीत करण्यात आला आहे. त्यामुळे दाव्यामध्ये तांत्रिक अडचण निर्माण होवू नये म्हणून प्रस्तूतचा अर्ज मंजूर व्हावा अशी वादीने मागणी केली आहे. प्रतिवादीने आपले म्हणणे दाखल करुन दावा दाखल करत असतांना आवश्यक पक्षकार समाविष्ट केले नसल्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा. तसेच यदा कदाचित न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या मर्जीस आल्यास जास्तीत जास्त खर्चासह अर्ज् मंजूर करण्यात यावा. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. निशाणी क्र. ४३ कडे दाव्यात आवश्यक पक्षकार समाविष्ट केले नसल्याबाबतचा मुद्दा निश्चीत करण्यात आला आहे. त्यामुळे दावा गुण-अवगुणावर अंतीमरित्या निकाली निघण्यासाठी प्रस्तावित प्रतिवादींना दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक दिसून येते. याशिवाय प्रतिवादी हे वादीचे आई, भाऊ व बहिण असल्याने त्यांची नावे दावा दाखल करतांनाच दाव्यामध्ये समाविष्ट करणे संभाव्य होते. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करत असतांना पक्षकार समाविष्ट करण्यास झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादीस ५००/- रुपये अर्जाचा खर्च म्हणून वादीद्वारे देणे आवश्यक आहे या मतास मी पोहचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. अर्ज वादीने प्रतिवादीस ५००/- रुपये खर्चाच्या स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत वाद पत्रामध्ये

दुरुस्ती करुन प्रस्तावित प्रतिवादी यांना समाविष्ठ करावे आणि दुरुस्ती वाद पत्र सादर करावे.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०५/११/२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड